Reviews of Literature
Volume 1 , Issue 1 / Aug 2013 ISSN:-

# खिद्रापूर : एक प्राचीन ऐतिहासिक पर्यटन स्थळ

*माने एस. व्ही.*
इतिहास विभाग प्रमुख विजयसिंह यादव महाविद्यालय, पेठ वडगांव

***सारांश :***
पर्यटन हा अत्याधुनिक व झपाट्याने विकसित होणारा मानवाचा आर्थिक व्यवसाय आहे. पर्यटनाचा अभ्यास भुगोलाप्रमाणेच अर्थशास्त्र, समाजशास्त्र, इतिहास इत्यादीमध्ये केला जातो. प्राचीन कालखंडापासून मानवामध्ये प्रवासाची आवड दिसून येते. प्रवास हा त्याचा स्थायीभाव आहे. पूर्वी व्यापार, त्याशिवाय प्राचीन ग्रंथ व ज्ञान संग्रहित करणे, नवीन अनुभव घेणे, तीर्थयात्रा करणे हे प्रवासाचे हेतू आढळून येतात. व्यापरी मोठमोठ्या राज्यांच्या राजधान्या, शहरे यामधून प्रवास करून व्यापारामध्ये वृध्दी करत व याच माध्यमातून सांस्कृतिक देवाण–घेवाण झाली व परस्परांची जीवन पध्दती समजून घेतली गेली. प्राचीन काळातील प्रवासासंबंधी प्रवासवर्णनाचे विविध ठिकाणी संदर्भ उपलब्ध आहेत.

***प्रस्तवाना :***

उदा. : चीनचा युवान शाँग, इत्सिंग, इसवी सन 7 व्या शतकात मार्कोपोलो, इब्न बतुता

पर्यटन विकासामध्ये सांस्कृतिक, भौगोलिक घटकांप्रमाणेच ऐतिहासिक घटकाला स्थान आहे. एकूण परदेशी पर्यटकांपैकी बरेचसे पर्यटक हे भारतामधील ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा आकर्षणामुळे येतात. ऐतिहासिक घटक व घटना याबद्दल लोकांना कुतुहल व आस्था असते. अशा स्थानांना भेटी देण्याची इच्छा, पर्यटकांना तेथील इतिहास माहिती असेल तर होणे सहाजिकच आहे. महाराष्ट्र हा ऐतिहासिक प्रदेश असून त्यास दिर्घ परंपरा लाभली आहे. याठिकाणी अनेक ऐतिहासिक स्थाने असून त्यातील काही अवशेषांच्या रूपात तर काही नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. अशापैकीच एक दुर्लक्षित असलेले कोल्हापूर जिल्ह्यातील शिरोळ तालूक्यातील खिद्रापूरचे मंदीरे होय.

***कोपेश्वर परिसर :***

नागमोडी वळणे घेत कृष्णा नदी महाराष्ट्रातून कर्नाटकात प्रवेश करते. पश्चिमेकडून येणाऱ्या नद्यांना कडेवर घेऊन तिचा गंगासागराकडील प्रवास चालू होतो. कुरूंदवाड जवळ तिला पंचगंगा भेटते. पुढे दानवाडला तिला दूधगंगा मिळते दरम्यानच्या प्रदेशात तिने विस्तृत वळसा घेतला आहे. कोपेश्वराजवळ तिला चंद्रकोरीसारखे वळण आहे. खिद्रापूर हे गाव या वळणात सामावले आहे. राजापूरला पूर्व वाहिनी झालेली कृष्णा खिद्रापूरला वळसा घालून पश्चिम वाहिनी होते. खिद्रापूरला तिन्ही बाजूला कृष्णा असून पश्चिम दिशेला ओता पलिकडे टाकळी गाव आहे. कोपेश्वराचा हा परिसर पौराणिक व धार्मिक वारशाने समृध्द आहे.

***शिलालेख :***

कोपेश्वर मंदिरात व परिसरात एकूण बारा शिलालेख आहेत. त्यापैकी एक शिलालेख संस्कृत भाषेत असून देवनागरी लिपीत आहे. दक्षिण द्वाराच्या पूर्व बाजूला उभ्या दगडी शिळेवर सदर लेख कोरलेला आहे. देवगिरीचे यादव नृपती सिंघण यांचे हे आज्ञापत्र असून कोपेश्वर देवळाचा जीर्णोध्दार करून कुडल दामवाड (कुरूंदवाड) जुगूळ व शिरगुप्पी ही मिरज प्रातांतील गावे कोपेश्वरच्या पूजा–अर्चेसाठी दान दिल्याचा उल्लेख आहे.

दुसरा शिलालेख अंतराळ गृहाच्या उत्तर भिंतीवर कोरलेला आहे. मंदिराची सफाई करताना सदर लेख आढळून आला. या लेखाचे वाचन कोल्हापूरचे श्री. अनंत बळवंत करवीरकर व धारवाडचे डॉ. रित्ती यांनी केले.

तिसरा शिलालेख नगारखान्यातील दक्षिणेच्या भिंतीवर बसविलेला विरगळाच्या पट्टीवर जुन्या कानडीत असून सेनापती बोमेश याचा मृत्यू संगम खिंडीतील लढाईत झाल्याचे दर्शवतो. यावरही कालतिथी नाही. बाकीचे नऊ शिलालेख मंदिराच्या बाहेरच्या बाजूने नरपट्टाच्या मुर्तीखाली कोरलेले आहेत. त्यांचे वाचन व संकलन श्री. कुंदनगर यांनी केले आहे. शिलाहार राजा विजयादित्य यांचा दंडनायक बोपण्णा हा होता. त्याने आपल्या राजाची व स्वतःची स्तुती व पराक्रमाचे वर्णन शिलालेखात केलेले असून त्यावर कालनिर्देश नाही.

आणखी एका ताम्रपटात कोपेश्वर देवालयाचा उल्लेख आहे. ताम्रपटाचे वाचन श्री. श. गो. तुळपुळे यांनी त्याचा सारांश असा, चालूक्य राजा सत्याश्रयदेव यांचा लष्करी तळ कोपेश्वर देवळाच्या परिसरात भाव संवत्सर, ज्येष्ठ कृष्ण पक्ष, सोमवार सप्तमी शक संवत 1076 मध्ये होता. मिरज प्रांतातील सलगरे हे गाव करमुक्त करून दान दिल्याचा उल्लेख सदर ताम्रपटात असून सध्या हा ताम्रपट लंडन येथील म्युझियम मध्ये आहे.

***कोपेश्वर मंदिराविषयी असणाऱ्या लोककथा (दंतकथा)***

1)पांडव बनवासात असताना त्यांनी हे मंदिर बांधले. दैत्य किंवा राक्षसांनी हे मंदिर एका रात्रीत बांधले. पहाटे कोंबडा आरवल्यावर बांधकाम तसेच टाकून निघून गेले.
2)स्वर्ग मंडपातील गोल दगडी शिळा वरच्या उघड्या असणाऱ्या छतावर बसवायची होती. पण ती बसवायची राहून गेली.
3)जाताना तान्हे मूल सोडून गेले जे आज आपण द्वारपालाच्या रूपाने पाहतो. ते वाढून एवढे मोठे झाले आहे. प्रत्येक वर्षी त्याची गहूभर वाढ होते.
4)बादशहाची मुलगी शिल्पकलेवर मोहित झाली. ती मंदिर सोडून जाईना. ज्या मंदिराच्या मोहात ती पडली ते मंदिर बादशाही सैन्याने विद्रुप केले.
5)मंदिर बांधणारा एक मोठा राक्षस होता. इतका मोठा की, त्याची जमिनीत रूतलेली चार माणसाच्या येंगेत (गुंफलेल्या हातात) मावत नाही. चिलीमीतील खडा हलविला सुध्दा येत नाही. जो चिलिमीजवळ पडला आहे.

### *राजकीय कालखंड*

कोपेश्वर मंदिराशी निगडीत व उपलब्ध असलेल्या साधन सामुगीवरून बदामीचे चालुक्य, पन्हाळ्याचे शिलाहार, देवगिरीचे यादव व विजापूरची आदिलशाही याचा प्रत्यक्ष संबंध या मंदिराशी आलेला आहे. चालूक्य राजांनी हे मंदिर बांधले पण काही कारणाने पूर्णत्वाला गेले नाही. चालूक्य कालीन मंदिराची वैशिष्ट्ये कोपेश्वर मंदिरात आहेत. कालानुक्रमे ताम्रपट व शिलालेखातील उल्लेख पुढीलप्रमाणे आहेत.

1)मिरज ताम्रपट चालुक्य राजा सत्वाश्रय भाव संवस्तर ज्येष्ठ, कृष्ण पक्ष, सोमवार सप्तमी, शक 1076 (इ.स. 1154)

2)शिलाहार राजा विजयादित्य कारकिर्द 1142 ते 1150 (उपलब्ध शिलालेखावरून)

3)यादव राजा सिंघण, श्रीमुख संवस्तर शके 1136, चैत्र सुर्यपर्व सोमवार (इ.स. 1214–15)

यादव राजा सिंघण याने मिरज, खिद्रापूर, कोल्हापूर जे पन्हाळा अशी विजयी मोहिम करून शिलाहार राज्य देवगिरी राज्याला जोडले. सौंदत्तीचे रट्ट राज्य व गोव्याचे कदंब राज्यही यादवांनी जिंकले. त्यांची सत्ता या भागात 104 वर्षे राहिली.

देवगिरीचे राज्य बुडवून अल्लाऊद्दीन खिलजी दक्षिण भारतात आला. बहामनी राज्याच्या स्थापनेनंतर 5 शकले पडली. हा भाग विजापूरच्या आदिलशाही अंमलाखाली आला.

या मंदिराचा जीर्णोद्वार इ.स. 1214 साली यादव राज्य सिंघण यांनी केला आहे. जीर्णोद्वार व पूजा अर्चेसाठी मिरज विभागातील कुरूंदवाड, जुगूल, शिरगुप्पी ही गावे दिल्याचे वर्णन शिलालेखात आहे.

### *मंदिराची प्राचीनता :*

अजंठा व वेरूळ येथील उत्तकिर्ण गुहा मंदिरे व शिल्पकला ही इ.स. पूर्व 200 ते इ.स. 500 पर्यंतच्या काळात निर्माण झाली आहेत. त्या कलेपेक्षाही सुंदर व सरस कला कोपेश्वर मंदिरात आहे. बारकाव्याने नटलेल्या बोटभर उंचीपासून आठ फूट उंचीपर्यंतची शिल्प विविधता इथे आहे. अजंठा येथील जगप्रसिध्द चित्र पद्मपाणीच्या चेहऱ्यावरील भाव इथे अनेक मूर्तीतून प्रतीत होतात.

बुध्दाला एक अवतार मानले गेले. देवत्व प्राप्त करून दिलेल्या बुध्दाचे एक शिल्प या मंदिरावर आहे. जैन श्रावक व भगवान महावीर यांचीही शिल्पे येथे आहेत.

### *कोपेश्वर मंदिराची मोडतोड :*

औरंगजेब बादशहाच्या आज्ञेने मंदिराच्या मूर्ती फोडल्या अशी लोककथा आजही या परिसरात ऐकायला मिळते. नदी पलीकडे पूर्वेला शहापूर नावाचे गाव आहे. औरंगजेब बादशहाचा लष्करी तळ पूर्वी जिथे असायचा ते ठिकाण आजच्या काळी शहापूर म्हणून ओळखले जाते. दक्षिण भारत जिंकण्यासाठी औरंगजेब स्वतः नेतृत्व करीत होता. बराच काळ तो महाराष्ट्रात होता. विशाळगड, पन्हाळगड व विजापूरची आदिलशाही जिंकण्यासाठी त्याचा मुख्य तळ मिरज येथे होता इ.स. 1702 च्या सप्टेंबर व ऑक्टोंबर महिन्यात मिरज परिसरात कृष्णाकाठी होता. तेव्हा कोपेश्वर मंदिराची मोडतोड झाली आहे.

### *समाजाला गवसणी घालणारी कला*

कोपेश्वर मंदिर हे वास्तुशास्त्र व शिलाकला यांचा मनोहर संगम आहे. दीड हजार वर्षापूर्वी आमची शिल्पकला कशी बहराला आली होती. त्याची साक्ष देत हे मंदिर अजून उभे आहे. कोपेश्वर हे शंकराच्या अनेक नावापैकी एक नाव

शिल्पकलेने नटलेल्या मंदिरात कोपेश्वराचे मंदिर आणखी एक वैशिष्ट्याने वेगळे आहे. मंदिराच्या बाहेरील बाजूने देव, देवता व स्त्री–पुरूषांची जी शिल्पट्टी मंदिर असते तिला नरपट्ट म्हणतात. नरपट्टाखाली या मंदिराला गजपट्ट आहे. जो इतरत्र कुठेही बघायला मिळत नाही. गजावर आरूढ देव–देवतांचा अखंडपट्टा म्हणजे गजपट्ट. जमिनीच्या

समतळापासून आपल्य दृष्टीच्या समपातळीत गजपट्ट आहे. गजपट्ट्या खाली नक्षीदार कठड्यांची मालिका आहे. गजपट्टाची शिल्पे अत्यंत बारकाव्याने केलेली आहेत. हत्तीवर बसलेल्या देवता, त्यांची आभुषणे, पोषाख, हातातील आयुधे, त्यांनी घातलेले अंलकार इत्यादींचे अत्यंत बारीक बारकावे येथे पहायला मिळतात. येथील आभुषणे काळ्या दगडात असूनही खरोखरच्या अलंकाराचा भास निर्माण करतात. हत्तींच्या हालचालीच्या अनेक मृद्रा कलाकारांनी इथे दगडात जिवंत केल्या आहेत. एकाग्रतेचे शिखर गाठूनच त्यांनी ही कला कातळात ओतली आहे. अंदाजे दिड हजार वर्षापूर्वीच्या आपल्या देशातील समाज जीवनाचे व सांस्कृतिक जीवनाचे प्रतिबिंब कोपेश्वर देवालयाच्या माध्यमातून आपल्याला पहायला मिळते.

कोपेश्वर येथे दाखविण्यात आलेली स्त्री–पुरूषांची वेशभूषा व त्यांनी धारण केलेल अलंकार हा अभ्यास करण्याचा विषय आहे. केशरचनेचे अनेक प्रकार व अलंकार येथे दिसतात. त्याकाळाचे पुरूष केश राखीत असत, बांधित असत, शुंगारीत असत, हातात कडीतोडे घालीत असत. अनेक प्रकारची जानवी त्याकाळी वापरीत असत. स्त्रियांच्या अलंकारामध्ये पायातील पैंजणाचे, तोड्याचे, पायातील बोटातील जोडव्यांचे अनेक प्रकार व दागिन्यांच्या मालिकाच येथे पहायला मिळतात. ललनांच्या गळ्यात रूळणारे अनेक मौल्यवान हार इथे पहायला मिळतात. त्याकाळी वापरात असलेले एक बहुपयोगी प्रवासातील साधन येथील शिल्पात स्त्री व पुरूषांच्याकडे पहायला मिळते.

रामायणातील हनुमान–राम भेटीचा पहिला प्रसंग, हनुमान सिता भेट व महाभारतातील प्रसंग येथे दाखविले आहेत. विष्णूचे दहा अवतार येथे आहेत.

त्याकाळी वापरात असलेली वाद्ये व त्यांचे आकार येथे पहायला मिळतात. डमरू वादक आहे, वीणावादक आहेत, बासरी वादक, ढोलवादक, सनई व भोंगळा वादक, टाळवादक, झांजवादिक आहेत. तेथे ते वाद्य वाजविताना होणाऱ्या शारीरिक हालचाली व स्वभाव सुध्दा अजून दिसून येते.

कृष्णाकाठचा हा मैदानी प्रदेश, दोन्ही तीरावर काळी भोर जमीन अनेक मैल पसरली आहे. बांधकामाचा दगड जवळपास उपलब्ध नाही. मंदिराला वापरलेल्या प्रचंड दगडी शिला पाहिल्यावर मन चक्रावून जाते. या भागात या प्रचंड शिळा आणल्या असतील कशा ? आणि मन भूतकाळात तर्काच्या वाटेने सुसाट धावते.

### *संदर्भ ग्रंथ*

1)श्री. गजानन हुद्दार : कोपेश्वर मंदिराची माहिती

2)सौ. अलका भरत कुलकर्णी : खिद्रापूरचे कोपेश्वर मंदिर

3)श. गो. तुंळपुळे : प्राचीन मराठी कोरीव लेख, 1963, पु. 334–40 क्र 63

4)पंडित महादेवशास्त्री जोशी व सौ. पद्मजा होडारकर : भारतीय संस्कृती कोष

5)सेतुमाधवराव पगडी : मोगल दरबाराची बातमीपत्रे खंड 1 व 2

6)डॉ. जयसिंगराव पवार : मराठ्यांचे स्वातंत्र्ययुध्द